**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४२ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४२ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ मंगळवार दिनांक १४/७/२००९, सभा क्रमांक- २ मंगळवार दिनांक २८/७/२००९ व सभा क्रमांक- ३ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :-मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१ मंगळवार दिनांक १४/७/२००९, सभा क्रमांक-२ मंगळवार दिनांक २८/७/२००९ व सभा क्रमांक-३ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.लोंढे शि.बा.:-आजचे सभेमध्ये मागिल सभा दिनांक १४/७/२००९,दिनांक२८/७/२००९ व दिनांक ३१/७/२००९या एकूण तीनही सभांचे इतिवृत्त कायम करणेसाठी घेतलेले आहे ते नियमानुसार आहे का?

मा.सहा.आयुक्त श्री.देशमुख आर.ए.:-मागिल सभेचे इतिवृत्त त्याचे पुढील सभेमध्ये कायम करण्यांस घेण्यात येते.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम ३ ज मध्ये स्थायी समितीचे कामकाजा बाबतचे नियमामध्ये कार्यवृत्ताबाबत सभेतील कामकाज संबंधीचे एक या कार्यवृत्त या प्रयोजनासाठी तरतुद करण्यांत आलेल्या पुस्तकात नमुद करून ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याने सही केली पाहिजे अशी तरतुद आहे. परंतु तसे प्रतेंक सभेचे इतिवृत्त पुढील सभेमध्ये कायम करण्यांस न घेता एकाच वेळी तीनही सभांचे इतिवृत्त कायम करण्यांस घेतलेले आहे हे नियमाप्रमाणे आहे का ?

मा.श्री. भोसले ग.पुं.:- सभेचे इतिवृत्त तात्काळ कायम करण्यांत यावे असे काही आहे का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.सदस्यांनी तीनही सभांचे इतिवृत्त कायम करणे नियमानुसार आहे किंवा कसे अशाबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. आजचे सभेचे इतिवृत्त त्याचे पुढील सभेमध्ये कायम करण्यांस घेणेत यावे हे नियमाप्रमाणे आहे त्यामुळे मा. सदस्यांनी एखादया विषयावर काय मत व्यक्त केले सभेमध्ये काय चर्चा झाली ते इतिवृत्त वाचले नंतर समजून येते. इतिवृत्तामध्ये घेतलल्या नोंदी बरोबर आहे किंवा ते चुकीची लिहीले गेले हे मा.सदस्यांना सुचविता येते त्या करिता सभेचे इतिवृत्त पुढील सभेमध्ये कायम करण्यांस घेणेत यावे. इतिवृत्त कायम झाले नंतर सभेमध्ये झालेल्या निर्णयावर अमंलबजावणी करणे प्रशासनास सोईस्कर होते त्याकरिता मागिल सभे मध्ये विधी तज्ञाचे पॅनलवर नेमणूका करणे विषयी प्रस्तावामध्ये इतिवृत्त कायम होण्याची वाट ना पहाता ठरावा वर कार्यवाही करावी अशाबाबत उल्लेख करण्यांस नगरसचिव यांना सुचना केली होती. त्याप्रमाणे तशी नोंद केली आहे. यापुढे सभा झाले नंतर सभेचे इतिवृत्त तयार करून पुढील सभेत कायम करण्यांस साठी घेण्यांत यावे. अशा बाबत नगरसचिव यांना सुचना देत आहे. पुढील वेळी विलंब केला जाणार नाही.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- बजेट चे ठरावावर अंमलबजावणी झाली आहे काय ? सदरचे ठराव संबंधीत विभागाकडेस पाठविलेले आहेत का ?

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :-अंमलबजावणी झाली आहे ठराव संबंधीत विभागाकडेस पाठविलेले आहेत.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- मा.स्थायी समितीची बजेटची सभा झाले नंतर आठ दिवसांनी मा. महासभेची सभा घेणे आवश्यक होते.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :-महानगरपालिकेचे महासभा प्रत्येक महिन्याचे वीस तारखेचे आंत व्हावयास हवी मा.स्थायी समितीच्या चार सदस्यांनी सहया करून लेखी मागणी केल्यावर अशी विशेष सभा बोलावली पाहिजे अशी मा. महासभेचे कामकाजाचे नियमामध्ये तरतुद आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- स्थायी समिती सभे मध्ये होणा-या चर्चे चे रेकॉर्डीग करणेत यावे. मागिल सभेमध्ये महानगरपालिका सदस्यांना मिळणारे निधी बाबत चर्चा केली होती

मा.श्री.गव्हाळे वि.ना.:-मा.विरोधी सदस्यांचा विरोध त्याप्रमाणे नोंदविलेला आहे मा.सदस्यांनी विषयांतर करू नये

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.स्थायी समिती सभेचे रेकॉर्डीगची प्रथा नाही.

मा.श्री. पवार बा.रे.:- मागिल सभांचे इतिवृत्त कायम करावे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- मागिल तीनही सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक १४/७/२००९, दिनांक २८/७/२००९ व दिनांक ३१/७/२००९ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १ मंगळवार दिनांक १४/७/२००९, सभा क्रमांक- २ मंगळवार दिनांक २८/७/२००९ व सभा क्रमांक- ३ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४३ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४३ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २९ मधील बालीकाश्रम रोड समोरील झोपडपट्टी निलक्रांती चौक व परिसरात नवीन इले. पोल, स्पॅन व ४० वॅट टयुब फिटींग बसविणे चे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,३३,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. २९ मध्ये बालिकाश्रम समोरील झोपडपट्टी निलक्रांती चौक व परिसरात पोल सह स्ट्रिट लाईट बसविणे.

२] प्रभाग क्रमांक २९

३] सुचविणा-यांचे नांव मा.श्री. संजय छगन शेंडगे

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- ५% मागासवर्गीय कल्याणकारी योजना स.नं. २००९-२०१०

ब] तरतूद :- रू. ५०,००,०००/-

क] यापुर्वीचा खर्च :- रू. ४७,६६,४१०/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. २,३३,०००/-

इ] एकुण खर्च :- रू. ४९,९९,४१०/-

ई] शिल्लक :- रू. ५९०/-

५] सद्यस्थिती :- हया भागात कोणती ही लाईट सोय नाही हया भागात स्ट्रीट लावणे गरजचे आहे.

६] प्रस्ताव :-

अ] रस्ते लांबी -- रूंदी --

ब] पाईप लाईन लांबी -- व्यास --

क] गटर

ड] इमारतीचे क्षेत्रफळ

इ ] इतर

ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष ----

७] दरसुची :- २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. २,३३,०००/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री. बाळासाहेब सावळे Sdxxx

१०] उपशहर अभियंता :- इले.विभाग प्रमुख यांच्या प्रस्तावानुसार मागासवर्गीय क. योजना अंतर्गत रू.२,३३,०००/- खर्चास मा.स्थायी समिती पुढे प्रशासकीय मान्येतस्तव सादर.

दि. ९/६/०९

११] शहर अभियंता :- रक्कम रू.२,३३,०००/- चे प्रस्तावास प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करणे योग्य दि. ९/६/०९

१२] मुख्य लेखा परिक्षक :- सादर रक्कम रू. २,३३,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव दि.९/६/०९

१३] मुख्य लेखाधिकारी :- अहवालाप्रमाणे रक्कम रू.२,३३,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणे योग्य दि.९/६/०९

१४] मा.उपायुक्त :- १] सन्माननीय सदस्य यांचे शिफारसपत्र Letter Pad वरती असावे.
२] नगर रचनाकार यांचा अभिप्राय घेउन सादर करा. दि.१०/६/०९

मा. नगररचनाकार :- सादर, प्रकरणा सोबत जोडलेला नकाशा पाहता विषयांकित काम हे बालिकाश्रम समोरील "घोषीत झोपडपट्टी" मध्ये प्रस्तावीत केलेले दिसते सबब सदर काम करणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब :- 'अ' प्रस्तावीत पाहता मान्य करणेस हरकत नाही. दि.१२/०६/०९

मा.आयुक्त साहेब :- सन २००९-१० चा अर्थसंकल्प मंजूर नाही, खर्च कसा करणार ? दि.१६/६/०९

इलेक्ट्रीकल वि.प्रमुख श्री. बाळासाहेब सावळे :- मा.सादर, सदरचा प्रस्ताव विशेष अर्थसंकल्प एप्रिल २००९ ते जुलै २००९ अखेर चे अर्थ संकल्पात समाविष्ठ आहे तशी नोंद पा.न ४२ असुन तरतुद ५०,००,०००/- लक्ष आली आहे. रिपोर्ट फेर सादर. दि.१७/६/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. १७/०६/०९.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र. २९ मधील इले. फिटींगचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत करणेस व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:-ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेस हरकत नाही.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे.:- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २९ मधील बालीकाश्रम रोड समोरील झोपडपट्टी निलक्रांती चौक व परिसरात नवीन इले. पोल, स्पॅन व ४० वॅट टयुब फिटींग बसविणे चे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,३३,०००/- (रूपये दोन लाख तेहतीस हजार फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमादेक :- मा.श्री.पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४४ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४४ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ यांची दिनांक २४/६/२००९ ते दि. २३/१२/२००९ अखेर सहा महिन्यांकरिता रूपये १,५००/- चे दरमहा तसेच भुलतज्ञ डॉक्टर यांची प्रतेंक मेजर ऑपरेशन साठी रूपये ४००/- व मायनर ऑपरेशन साठी रूपये २००/- चे मानधनावर दिनांक ४/७/२००९ ते दिनांक ३/१/२०१० अखेर सहा महिन्याकरिता नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय-बालरोग तज्ञांची मानधनावर नेमणुक करणेबाबत. आस्थापना विभाग
दि. १५/७/२००९

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मा.मुख्य वैद्यकिय अधिकारी,यांनी रिपोर्ट देवुन कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचिवर बालरोग तज्ञांचे पद मंजूर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची(ऑनररी बालरोग तज्ञ म्हणून)मानधनावर नेमणुक करावी लागते.कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री.अनिरूध्द गिते,डॉ.श्री. सुचित तांबोळी, यांची दर महा रू.१५००/- मानधनावर दि.२३/१२/२००८ ते २२/६/२००९ अखेर सहा महिन्या करिता नेमणुक केलेली होत सदरच्या नेमणुकी ची मुदत दि.२२/६/०९ रोजी संपत आहे.

सदर बाल रोग तज्ञाची मुदत संपत असल्याने त्यांनी अर्ज देवुन त्यांचे सेवा पुढील काळात चालु ठेवण्यासाठी विनंती अर्ज दिलेले आहे.

वरील बालरोग तज्ञ बा.दे.दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषघोपचार करतात त्यामुळे दवाखान्यात येणा-या गरीब व गरजु रूग्णांना जास्तीत जास्त फायदा होतो.

तसेच सन २००-२०१० मधील एप्रिल २००९ ते जुलै २००९अखेरच्या विशेष अर्थ संकल्पात स्थायी आस्थापना ऑनररी डॉक्टर्स या लेखाशिर्षा खाली रू.१,३३,०००/- तरतुद केल्याबाबत नमुद करून डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते , डॉ. श्री. सुचित तांबोळी, बालरोग तज्ञांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये दिनांक २४/६/०९ ते २३/१२/०९ अखेर सहा महिन्याकरिता दरमहा रू. १५००/- मानधनावर नेमणुक होण्याबाबत विनंती केली आहे.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ मध्ये कलम ५३(१) अन्वये कारवाई करणे बाबत नमुद केले असुन सहा महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत कलम ५३(१) मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे. ५३:- नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे.

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पूर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणी उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्व मंजूरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२.पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणा खालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती ,नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही.असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणुकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही आणी भत्ते वगळुन शंभर रूपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

या पुर्वी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत मागील कालावधीस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला असुन अद्यापपर्यत मागील कालावधीच्या नेमणुकीस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळालेली नाही.

तरी बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथील येणा-या रूग्णांची निकड लक्षात घेता व वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे प्रस्तावा प्रमाणे डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते , डॉ. श्री. सुचित तांबोळी, बालरोग तज्ञांची रू. १५००/- मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता नेमणुक होण्याबाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे दि. १७/७/०९

मा.उपायुक्त साहेब :- CAFO दि. २०/०७/०९

मुख्य लेखा अधिकारी :- सादर, तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्यासाठी बालरोग तज्ञांची मानधनावर नेमणूक करणेस हरकत नाही. दि. २०/७/०९

मा.उपायुक्त साहेब :- "अ" प्रस्तावीत मा.स्थाई समिति चे मंजुरीने नेमणुक करणेसाठी मंजुरीस्तव सादर. दि२९/०७/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.३०/७/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-- ** --

विषय-भुल तज्ञांची पॅनलशिपवर नेमणुक करणे बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, यांनी रिपोर्ट देवुन कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता वैद्यकीय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची आवश्यकता असते. दि. ३/१/०९ ते २/७/०९ अखेर प्रत्येकी मेजर ऑपरेशन करीता रू.४००/- व प्रत्येकी मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणुक करण्यात आलेली असुन सदरची मुदत दि.२/७/०९ रोजी संपत आहे.

कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृहामध्ये प्रमुख्याने गरीब व मध्यम वर्गातील रूग्ण औषधोपचार व प्रसुति करीता येतात. त्यामुळे भुलतज्ञा अभावी ऑपरेशन करीता खाजगीरित्या भुलतज्ञांना कॉल केल्यास त्यांची भुल दिल्याबद्दलची फी रूग्णाना परवडणारी नसते. त्यामुळे रूग्णांची व पर्यायी हॉस्पीटलची गैरसोय होईल. तसेच हॉस्पीटलच्या दृष्टीने इर्मजन्सीच्या वेळी रूग्ण भुलतज्ञा अभावी दाखल करून घेणे धोक्याचे होईल व त्यामुळे हॉस्पीटल मध्ये दाखल होणा-या रूग्णांच्या संख्येवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करणे गरजेचे आहे.

तसेच दवाखान्यात दर महा साधारणतः५० ते ६० मेजर ऑपरेशन व ३०ते ४०मायनर ऑपरेशन करीता भुलतज्ञांची आवश्यकता असते.सद्या भुल दिल्या बद्दल महानगरपालिका दि.१/४/२०००पासून १)जनरल ॲनस्थेशिया (ऑपरेशन टयुबेकटोमी व्यतरिक्त) रू. १००/- २) लोकल ॲनस्थेशिया रू.३०/- प्रत्येक ऑपरेशन करीता फि म्हणुन वसुल केली जाते.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये दिनांक ४/७/०९ ते ३/१/२०१० अखेर सहामहिन्या करीता पॅनलशिपवर प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता ४००/- व मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे शहरातील इच्छुक भुल तज्ञांची नेमणुक करणे बाबत विनंती केलेली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ मध्ये कलम ५३(१) अन्वये कारवाई करणे बाबत नमुद केले असुन सहा महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत कलम ५३(१) मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे. ५३:- नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहीत असणे.

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पूर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणी उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यावर महानगरपालिकेच्या पूर्व मंजूरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२.पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणा खालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती ,नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही.असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणुकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही आणी भत्ते वगळुन शंभर रूपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

या पुर्वी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत मागील कालावधीस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला असुन अद्यापपर्यंत मागील कालावधीच्या नेमणुकीस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळालेली नाही.

तरी के.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथील येणा-या रूग्णांची निकड लक्षात घेता व वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे प्रस्तावा प्रमाणे सोबत जोडलेल्या इच्छुक भुल तज्ञांच्या यादी प्रमाणे भुल तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू. ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन रू. २००/- मानधनावर सहा महिन्याकरीता नेमणुक होण्याबाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.दि. १७/७/०९

मा.उपायुक्त साहेब :- CAFO दि. २०/७/०९

मुख्य लेखा अधिकारी :- सादर, आरोग्य विभागाने प्रस्तावीत केल्याप्रमाणे वैद्यकीय अधिका-यांची मानधनावर नेमणूक करणेस हरकत नाही. सदर नेमणूक सहा महिन्यासाठी वैध राहील. दि. २४/७/०९

मा.उपायुक्त साहेब :- स्थाई समितीचे मंजुरीने भुलतज्ञांची नेमणुक करणे साठी मंजूरीस्तव सादर. दि.२९/७/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.३०/७/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे बालरोग तज्ञ व भुल तज्ञांची मानधनावर नेमणूक करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे बालरोग तज्ञ नेमणूकी बाबत ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविणेत आला.

मा.सभापती साहेब :- डॉ.श्री. टेकवाणी यांनी प्रस्तावाची माहिती सांगावी.

मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. टेकवाणी :- आपले कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये चार ते साडेचार हजार नवजात शुशुचा जन्म होतो. त्यामधील काही नवजात शुशुंना तज्ञ डॉक्टराचे उपचाराची आवश्यकता असते आपले कडेस बालरोग तज्ञ नसलेने मानधनावर त्यांची नेमणूक केली जाते. बालरोग तज्ञ यांचे हॉस्पीटलला व्हीजीट देण्याचे दिवस ठरलेले असतात म.न.पा. डॉक्टरांनी राउन्ड घेतल्या नंतर ते राउन्ड घेतात आवश्यकता असणा-या नवजात शुशुंना ते तपासतात औषधोपचार करतात.त्यामुळे आपले दवाखान्यामध्ये नवजात शुशु दगावण्याचे प्रमाण अत्यंल्प आहे, कमी आहे त्यांना रूपये १५००/- दरमहा मानधन देणेत येते तसेच कै.बा.दे. दवाखान्यामध्ये ३० ते ४० दरमहा सिझर होतात तेथे रोज होणा-या ऑपरेशन साठी भुलतज्ञाची आवश्यकता भासते.आपण वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देउन्न प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रूपये ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन साठी ३००/- रूपये याप्रमाणे मानधनावर एकूण ११ भुलतज्ञ डॉक्टरांची पॅनलशिपवर नेमणूक केलेली आहे. बालरोग तज्ञ व भुलतज्ञ डॉक्टरांची सहामहिन्या करिता मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणेस विनंती आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना परिसरातील अतिक्रमणाबाबत तसेच तेथील स्टाफ बाबत तक्रारी येतात.

मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. टेकवाणी :- दवाखान्यामधील स्टाफ ने दवाखान्यामध्ये येणा-यांशी प्रेमाने बोलावे असे आम्ही सांगतो. परंतु स्टाफ मधील काही कर्मचारी नागरिकांशी चुकीची भाषा बोलतात त्यांना समाजावून सांगतो जे ऐकत नाही त्यांचा रिपोर्ट करतो स्टाफवर करावयाचे कारवाई बाबत आपण आम्हास सर्वांनी सहकार्य करावे.

मा.श्री.गव्हाळे वि.ना.:-त्यांचेवर कार्यवाही करावी . कर्मचा-यांनी नागरिकांना चांगली वागणूक त्यांनी द्यावी अन्यथा त्यांचेवर कारवाई करावी.

मा.श्री. पवार द.ज.:- उध्दट कर्मचा-यांवर कार्यवाही करावी .आम्हा सर्वाचा पाठिंबा आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- काम चुकार कर्मचा-यावर कार्यवाही करावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- संस्था म्हटले तर हे चालतेच परंतु आपण सुधारणा करावी त्यांना सुधारणे गरजेचे आहे.

मा.श्री. पंजाबी ज.नि. व मा.श्री. लोंढे शि.बा.:- आम्हा सर्वाचे आपणांस समर्थन आहे आपण योग्य ती कारवाई करणेचा निर्णया घ्यावा.

मा.श्री.पवार द.ज.:- कै.बा.दे.दवाखान्याचे स्टाफचे वर्तणूकी मध्ये सुधारणा व्हावी आपण त्याचेवर कार्यवाही करावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- ऑफिस रिपोर्टानुसार बालरोग तज्ञ व भुल तज्ञांची सहामहिन्यांसाठी नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ यांची दिनांक २४/६/२००९ ते दि. २३/१२/२००९ अखेर सहा महिन्यांकरिता रूपये १,५००/-(रूपये एक हजार पाचशे फक्त) चे दरमहा मानधनावर तसेच भुलतज्ञ डॉक्टर यांची प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रूपये ४००/-(रूपये चारशे फक्त) व मायनर ऑपरेशन साठी रूपये २००/-(रूपये दोनशे फक्त) चे मानधनावर दिनांक ४/७/२००९ ते दिनांक ३/१/२०१० अखेर सहा महिन्याकरिता नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपाट जगन्नाथ. सही /-

अनुमादेक :- मा.श्री.पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४५ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४५ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिके करिता मा. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण निर्मुलनासाठी प्रस्तावीत नागरी पोलीस यंत्रणा व विशेष न्यायालयासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम५१ नुसार आकृती बंधाचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय-राज्यातील नागरी भागातील अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियत्रंण व निर्मुलनासाठी उपाय योजना.

आस्थापना विभाग
दिनांक १९/६/२००९

सादर,

विनंती रिपोर्ट की, मा. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. कडोमपा- १००६ / प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८दि.२ मार्च २००९अन्वये राज्याच्या नागरी भागात अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियत्रंण / निर्मुलनासाठी खालील प्रमाणे उपाय योजना अंमलात आणण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

(i) संरचनात्मक सुधारणा

(१) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी सर्मर्पित सक्षम यंत्रणा निर्माण करणे

(अ) अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियत्रंण व निर्मुलन पथक

(ब) नागरी पोलिस :- नागरी पोलिसांची योजना महानगरपालिकांकरीता अनिवार्य व नगरपालिकाकरीता ऐच्छिक राहील.

(२) नागरी गुन्ह्यासाठी स्वतंत्र्य विशेष पोलिस ठाणे

(३) नागरी गुन्ह्यासाठी स्वतंत्र्य न्याययंत्रणा

नागरी पोलिस विशेष पोलिस स्टेशन व विशेष न्यायालये अशी सर्व यंत्रणा संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेने ठराव करुन मागणी केल्यास व खर्चाची जबाबदारी स्थायीरित्या स्विकारल्यास निर्माण करण्यांत येणार असल्याने यासाठी आस्थापना खर्चाची विहित करण्यात आलेली मर्यादा शिथिल करण्यांत येईल.

(ii) क्षेत्रीय पातळीवर अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमनासंदर्भात करावयाच्या कार्यवाही विषयी जबाबदारी आणि कार्यपध्दती यांची सुस्पष्ट मांडणी (सोबत मा. शासन निर्णय)

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन कंडोमपा - १००६ / प्र.क्र.१९२ / २००६ / नवि-२८, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०२/०३/२००९ अन्वये सर्व महानगरपालिका यांना पत्र देवुन त्यामध्ये खालील प्रमाणे सुचित केलेले आहे.

(०२) नागरी पोलिसांची योजना महानगरपालिकेला अनिवार्य व नगरपालिकाकरिता ऐच्छिक करण्यांत आली आहे. नागरी पोलिस यंत्रणा उभी करण्यासाठी संबधीत महानगरपालिका / नगरपालिकाकडुन स्थायीरित्या पुर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पदे निर्माण करण्यासाठी प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला जाईल.

तसेच विशेष पोलिस ठाणे स्थापन करण्यासंबंधी महानगरपालिकेकडुन ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फ़त आवश्यक प्रस्ताव गृह विभागाकडे सादर करण्यांत येईल.

(०३) विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी संबधीत महानगरपालिका / नगरपालिका कडुन स्थायीरित्या पुर्ण खर्च उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबधी ठराव नगर विकास विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेने विशेष न्यायालय स्थापन करणेसाठी पुढील कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल.

नागरी पोलिस विशेष पोलिस ठाणे व विशेष न्यायालयासाठी प्रस्ताव करताना विविध वर्गाच्या महानगरपालिका/नगरपालिका(विवरण पत्र अ,ब,क)मध्ये दर्शविलेल्या संभाव्य आकृतीबंधाचा विचार करु शकतील

**परिशिष्ट अ**

अतिक्रमण निर्मुलन व अनाधिकृत बांधकाम नियत्रंण इत्यादी साठी महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलिस यंत्रणेसाठी आकृतीबंध

| अ नं | पदनाम | वेतनश्रेणी असुधारीत | महानगरपालिका | | | | नगरपालिका | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | अ | ब | क |
| १ | अतिरीक्त पोलिस आयुक्त | १६४००-४५०-२०००० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | पोलिस उपायुक्त/ अतिरिक्त पोलिस अधिक्षक | १००००-३२५-१५२०० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | सहा. पोलिस आयुक्त / पोलिस उपअधिक्षक | ८०००-२७५-१३५०० | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० |
| ४ | पोलिस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | ३ | ३ | १ | १ | १ | ० | ० |
| ५ | सहा. पोलिस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ |
| ६ | पोलिस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | ६० | १० | ६ | ४ | २ | १ | १ |
| ७ | सहा.पोलिस उपनिरीक्षक | ४५००-१२५-७००० | ९६ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | पोलिस हवालदार | ४०००-१००-६००० | १५० | १० | ६ | ४ | २ | १ | १ |
| ९ | सशस्त्र पोलिस शिपाई | ३०५०-७५-४५९० | ३९० | ६० | ३६ | २४ | १२ | ६ | ६ |
| १० | महिला पोलिस शिपाई | ३०५०-७५-४५९० | ३९० | ४० | २४ | १६ | ८ | ४ | ४ |
| ११ | पोलिस नाईक/ वाहन चालक | ४०००-१००-६००० | १० | ६ | ४ | ३ | २ | १ | १ |
| | **एकूण पदे** | | **११०४** | **१३२** | **७८** | **५३** | **२९** | **१४** | **१४** |

**परिशिष्ट ब**

नागरी गुन्ह्याच्या नोंदणी तपास व खटला भरण्याकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलिस स्टेशन यांचे आकृतीबंध

पोलिस स्टेशन नमुना २ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी )

| अ. नं | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | सहा. पोलिस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २ | पोलिस उपनिरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३ | सहा.पोलिस उपनिरीक्षक | ४५००-१२५-७००० | १ |
| ४ | पोलिस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ४ |
| ५ | पोलिस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-४५९० | ८ |
| ६ | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-४५९० | १ |
| ७ | वाहन चालक | ३०५०-७५-४५९० | १ |
| | | **एकूण** | **१७** |

**परिशिष्ट क**

नागरी गुन्ह्यासाठी स्थापन करावयाचे विशेष न्यायालय

न्यायालये नमुना २ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ. नं | पदनाम | पद संख्या | वेतनश्रेणी (असुधारीत) |
|---|---|---|---|
| १ | सह.दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १ | १२८५०-३००-१३१५०-४००-१७५५० |
| २ | सहाय्यक अधिक्षक | १ | ५०००-१५०-८००० |
| ३ | लघुलेखक (नि.श्रे.) | १ | ५५००-१७५-९००० |
| ४ | वरिष्ठ लिपीक | १ | ४०००-१००-६००० |
| ५ | कनिष्ठ लिपीक | २ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ६ | बेलिफ | १ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ७ | शिपाई | २ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| | **एकूण** | **९** | |

अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपातंर होवुन सुमारे १ लाख लोकसंख्येची भर शहरात पडलेली आहे. आजमितीस सन २००१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ३,०७,४५५ व क्षेत्रफ़ळ ८५.१४ चौ. कि. मी. असुन दिवसेदिवस शहराचा विकास होत आहे. शहरातुन एक राष्ट्रीय महामार्ग जात असुन व एकुण आठ राज्य मार्ग जात आहेत. तसेच अंतर्गत स्वरुपाची मोठ्या प्रमाणावर रस्ते आहेत.

त्याचप्रमाणे शहरांमध्ये व उपनगरामध्ये अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या दिवसे दिवस गंभीर होत असल्याचे दिसुन येत आहे. त्याकरिता सक्षम यंत्रणा कार्यरत असणे अत्यावश्यक झालेले आहे.

सदरची सक्षम यंत्रणा कार्यरत झाल्यानंतर रस्ते वरील अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन केल्यास वहुतांशी अपघात टाळण्यास मदत होईल. व शहरांमधील व उपनगरांमधील अनाधिकृत बांधकामे रोखण्यास मदत होईल जे करुन अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवुन त्यांचे विरुध्द तात्काळ कारवाई करणे शक्य होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या महसुलाच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

त्या करिता वरील प्रमाणे पद संख्या व वेतनश्रेणी मंजुर झाल्यास दर महा रुपये ५,६०,१०९/- इतका अंदाजे खर्च होवुन वार्षिक अंदाजे रुपये ५५,८७,८८७/-इतका खर्च अपेक्षित होईल.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २००८-२००९ मधील आस्थापना खर्च रु. ५७.६०% इतका असुन त्यामध्ये ०.८३%ने वाढ होवुन ५८.४३% इतका होईल.

वरील दिनांक २ मार्च २००९ च्या शासन निर्णयामध्ये अशा स्वतंत्र व्यवस्थेकरिता येणा-या संपुर्ण आवर्ती / अनावर्ती खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थ संकल्पात स्वतंत्र लेखाशिर्षाखाली अर्थ संकल्पीय तरतुद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

त्यामुळे वरील प्रस्तावाबाबत खर्चाची तरतुद अर्थसंकल्पामध्ये करणे आवश्यक आहे.

उपरोक्त वरील शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेकरिता आकृतीबंधाचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ नुसार मा. स्थायी समिती व मा. महासभेच्या मंजुरीचा ठराव मा. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

तरी नागरी भागातील अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी उपाय योजना आकृतीबंधाचा प्रस्ताव मा. स्थायी समितीची मंजुरी घेवुन मा. महानगरपालिकेच्या महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.२७/७/०९

मा.उपायुक्त साहेब :- स्थायी समितीची मंजुरी होउन्न महासभेकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर. दि.२९/७/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.३०/७/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- महानगरपालिकेने अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलनासाठी नागरी पोलीस यंत्रणा व विशेष न्यायालयासाठीचे आकृतीबंधाचा सादर केलेला प्रस्ताव हा चांगला निर्णय आहे. परंतु यामुळे म.न.पा.चे आस्थापना खर्चात आतीरिक्त वाढ होईल तो खर्च महानगरपालिकेस परवडणार आहे का ?

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकाचा सन २००८-२००९ सालचा आस्थापना खर्च रु. ५७.६०% इतका असुन तो वाढून ५८.४३% इतका होईल हा खर्च महानगरपालिकेस परवडणार का ?

मा.श्री. लोंढे शि.बा.:- या आकृती बंधाप्रमाणे अतिक्रमण निर्मुलन पथकाकडून सगळी कडील अतिक्रमणे काढली जातील का ? तसे न झाल्यास सदर यंत्रणा उभारून काय उपयोग होईल.

मा.श्री. कांबळे र.द.:- राज्यातील अतिक्रमणावर नियंत्रण ठेवणेसाठी मा. शासन निर्णय आहे

मा.सभापती साहेब :- या पथकावर नियंत्रण कुणाचे राहिल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सुपरीटेड ऑफ पोलीस यांचे राहिल.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- महानगरपालिकामार्फत अतिक्रमणे काढली जातात. आपणांस पोलीस बंदोबस्त किती वेळा लागतो.बंदोबस्तासाठी किती खर्च झालेला आहे तो सांगावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- झालेला खर्च सांगावा.

मा.श्री. पवार बा.रे.:- बिगरपरवाना बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन यंत्रणा निर्माण करणे म्हणजे काय करणे आहे. आपला अतिक्रमण विभाग सक्षम नाही का ?

आस्थापना वि.प्रमुख श्री. साबळे अे.डी.:- शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम /अतिक्रमण निर्मुलनासाठी नागरी पोलीस यंत्रणा व विशेष न्यायालयासाठीचे आकृती बंधास मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- अतिक्रमण निर्मुलन यंत्रणा निर्माण करणे म्हणजे काय ? पोलीस संरक्षण व हि यंत्रणा वेगळी आहे का ? खुलासा करावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.सभापती महादेय, या प्रकरणी खुलासा करीतो की, राज्यातील नागरी भागातील अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी उपाय योजना आंमलात आणण्याचा मा.शासनाने निर्णय घेतलेला आहे.शासनाचे निर्णयानुसार संरचनात्मक सुधारणा तीन मुद्दा मध्ये दर्शविलेली आहे.त्यामध्ये मुद्दा (१) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी समर्पित सक्षम यंत्रणा निर्माण करणे (अ) अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियत्रंण व निर्मुलन पथक तयार करणे.(ब) नागरी पोलिस :- नागरी पोलिसांची योजना महानगरपालिकांकरीता अनिवार्य व नगरपालिकाकरीता ऐच्छिक राहील. (२)नागरी गुन्ह्यासाठी स्वतंत्र्य विशेष पोलिस ठाणे (३) नागरी गुन्ह्यासाठी स्वतंत्र्य न्याययंत्रणा याप्रमाणे सर्व यंत्रणा संबंधी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ठराव करून मागणी केल्यास व खर्चाची जबाबदारी स्थायीरित्या स्विकारल्यास निर्माण करता येणार असल्याने त्यासाठी आस्थापना खर्चाची विहित केलेली मर्यादा शिथिल करण्यांत येईल. आपण केलेला ठराव महासभेचे मंजूरी नंतर नगर विकास विभाग मंजूरी करून तो गृह विभागाकडेस सादर केला जाईल.

यामध्ये अनाधिकृत बांधकाम /अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन पथका निर्माण करणेसाठी कर्मचारी नेमाणे त्यांना साहित्य घमेले फावडे कटर इत्यादी पुरविणे त्यांना वाहन उपलब्ध करून देणे याप्रमाणे पथक निर्माण करणे आहे. नागरिक अतिक्रमणाबाबत तक्रार करतो प्रशासन त्या बाबतची खात्री करून कारवाई बाबत ऑर्डर देते. कारवाई करण्यांस आपले पथक जाते. आपले पथक अधिकारी दहा, बारा बिगारी असा स्टाफ असतो. जमाव जास्त असताना कर्मचा-यांना मारहाण होणेचा प्रसंग येतो. कुणाला इजा झाल्यास पोलीस बंदोबस्त घेतला नाही मग जबाबदारी कुणाची. आपले हद्दीतील अतिक्रमण काढावयाचे ठरविले त्यासाठी पोलीस बंदोबस्ताची मागणी केल्यास उत्सव, मोर्चा, दौरे इत्यादी मुळे आपणास वेळेवर पोलीस बंदोबस्त मिळत नाही. कधी अपुरा मिळतो. तेव्हा काही प्रसंगी कार्यस्थळावर गर्दी जास्त झाली गोंधळ झाला तर कधी पोलीस ही तेथून बाजूस जातात. कोर्ट ऑर्डर होते.अशा घटना सगळी कडेच घडतात म्हणून शासनाने हा निर्णय घेतला न.पा., म.न.पाची पॅरलर पोलीस यंत्रणा निर्माण करणेचे ठरविले. विषय ऐच्छिक ठेवलेला आहे, खर्च परवडले त्यांनी ठेवावा. महानगरपालिकामध्ये मात्र लोकसंख्या वाढते तशी वस्ती वाढते. जागेच्या किंमती वाढतात, अतिक्रमण वाढते म्हणून शासनाने हा निर्णय घेतलेला आहे. अतिक्रमण पथक निर्माण करणे करिता आपले चार झोन विभागासाठी दहा जणांचे चार पथक केली तर अतिक्रमणावरील कारवाईचे ठिकाणी अशी आपली पन्नास जणांची टिम व पॅरलर पोलीस यंत्रणा या सक्षम यंत्रणे मुळे कामे चांगली व लवकर होतील. रस्त्यावरील अतिक्रमणे बहुतांशी निर्मुलन केल्यास शहरातील व उपनगररातील अतिक्रमणे अनाधिकृत बांधकामे रोखण्यास मदत होईल अतिक्रमणे अनाधिकृत बांधकामे यांचे विरूध्द तत्काळ कार्यवाही करणे शक्य होईल.म.न.पास हे कंपलसरी आहे.

मा.श्री.पवार बा.रे.:- आपला अतिक्रमण विभाग सक्षम आहे का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- नागरी पोलीस यंत्रणा महानगरपालिकेस अनिवार्य आहे.

मा.श्री.पवार बा.रे.:- आपले महानगरपालिकेचे केअरटेकर चे अधिकारी सगळीकडे फिरतात त्यांचे निदर्शनास सर्व काही येते परंतु नागरिक कर्मचा-यांना घाबरत नाहीत कुणी कंपाउत्र्ड चे बांधकाम करतो त्या कडे दुर्लक्ष केले जाते कुणी तक्रार केली तरच महानगरपालिकेस अतिक्रमण दिसते आपले अधिकारी नागरिकांस घाबरतात.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपले प्रभाग अधिकारी केअर टेक्ट सफाई कर्मचारी सगळे शहरात फिरतात कुणी कंपाउन्डचे काम करित असतो. प्लंबर, नळ फिटर रस्ता खोदाई करून नळ कनेक्शन देत असेल तर त्यास कुणीही विचारीत नाही. तक्रार करीत नाही वेळचे वेळी त्यांनी हे निदर्शनास आनले तर कारवाई होते नाही तर नाही म्हणून ही वेळ आली आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- आपली यंत्रणा सक्षम असेल तर अतिक्रमणाला आळा बसेल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- चार प्रभागाच्या टिम केल्या तर चांगली कारवाई करता येईल.

मा.श्री. पवार बा.रे.:- एकूण किती पदे नागरी पोलीस यंत्रणे साठी ठेवावीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-"ड" वर्ग महानगरपालिके करिता ५३ पदांचा व "अ" वर्ग नगरपालिकेसाठी २९ पदांचा पोलीस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध आहे. विशेष पोलीस स्टेशन साठी १७ पदांची पद संख्या दिली आहे. विशेष न्यायालयासाठी पद संख्या ९ दिली आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- वर्षाचे ३६५ दिवस काम पडणार नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-मा. शासन निर्णयानुसार हे अनिवार्य आहे. पोलीस यंत्रणे साठी २९ पदांचा आराखडा मान्य करावा त्यामध्ये २५ ते ४५ वयोगटातील स्टाफ असावा प्रस्ताव मंजूर करून महासभेकडे सादर करावा. महासभेमध्ये चर्चा करावी निर्णय घ्यावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- पोलीस यंत्रणेने नेमलेलीच कामे करावीत त्याचा अन्यत्र वापर होउ नये.

मा.श्री.पवार बा.रे.:- त्यांच्या बदल्या कराव्यात.

मा.उपायुक्त डॉ.श्री. जावळे साहेब :- त्यांच्या बदल्याचे आपण सुचवू शकतो.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- अतिक्रमण विभाग सक्षम व्हावा त्यामुळे अतिक्रमण अनाधिकृत बांधकामे यावर नियंत्रण राहिल.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- अतिक्रमण विभाग प्रमुख सभेत उपस्थित नाहीत.

मा.श्री. पवार बा.रे.:- प्रस्ताव सभे पुढे कुणी आणला आहे अतिक्रमण विभाग प्रमुख्याशी त्याबाबत चर्चा केलेली आहे का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-अतिक्रमण विभाग प्रमुखाशी चर्चा करूनच प्रस्ताव सादर केलेला आहे तो आस्थापना विभागाकडून सभे पुढे आला आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- अतिक्रमण विभागाची काय गरज आहे त्यांना काय आवश्यक आहे हे पाहिलेले नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. शासन निर्णयानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत महासभेत व नंतर नगर विकास विभागाकडेस सादर केला जाणार आहे. अतिक्रमण प्रमुख्याशी आमची चर्चा झालेली आहे कमी जास्त असे काही वाटत नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. व मा.श्री. पवार बा.रे.:- खर्च किती वाढणार आहे ते सांगावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ५७.६०% आस्थापना खर्च ०.८३ % ने वाढून ५८.४३% होणार आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थीती नुसार निर्णय घ्यावा.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- महानगरपालिकेचा आस्थापना खर्च वाढेल.

मा.श्री. पवार बा.रे.:- मा. शासन निर्णयानुसार "ड" वर्ग महानगरपालिके साठी असणारा ५३ पदांचा आकृतीबंध आपले महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती पहाता न परवडणार असल्याने शासन निर्णयामधील "अ" वर्ग नगरपालिकेचा २९ पदांचा आकृती बंध नागरी पोलीस यंत्रणे साठी स्विकारण्यास मंजूरी देण्यांत यावी आर्थिक परिस्थिती सुधारले त्या प्रमाणे "ड" वर्ग महानगरपालिकेचे ५३ पदापर्यत संख्या वाढविणेस मंजूरी देण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- ऑफिस रिपोर्टानुसार आवश्यकत्या कार्यवाहीस मंजूरी देण्यांत यावी मात्र पोलीस यंत्रणेचा वापर हा नेमलेल्या कामांसाठीच करावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरिता मा.शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलनासाठी "ड" वर्ग महानगरपालिकेकरितांचे नागरी पोलीस यंत्रणे साठीचा प्रस्तावीत ५३ पदांचा आकृतीबंध म.न.पा.ची आर्थिक परिस्थीती पहाता परवडणार नसल्याने शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलनासाठी "अ" वर्ग नगरपालिके करिता चे प्रस्तावीत पोलीस यंत्रणेचा २९ पदांचा आकृतीबंध महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता स्विकारणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी प्रस्ताव मंजूरी साठी मा. महासभेकडेस सादर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेकरिता मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलनासाठी "ड" वर्ग महानगरपालिके करितांचे नागरी पोलीस यंत्रणे साठीचा प्रस्तावीत ५३ पदांचा आकृतीबंध म.न.पा.ची आर्थिक परिस्थीत पहाता परवडणार नसल्याने शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलनासाठी "अ" वर्ग नगरपालिके करितांचे प्रस्तावीत पोलीस यंत्रणेचा २९ पदांचा आकृतीबंध स्विकारणेस, व शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे व प्रशासनाने सादर केल्याप्रमाणे परिशिष्ट 'ब' व परिशिष्ट "क" प्रमाणे अहमदनगर महानगरपालिके करिता आकृतीबंध स्विकारणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

अखेर मंजूरीसाठी मा. महानगरपालिका सभे कडेस सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४६ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४६ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील राघवेंद्र स्वामी मंदिर ते बोल्हेगांव फाटा परिसरातील रेणुकानगर, मनोलीकानगर, बालाजीनगर, साईनगर येथे पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १७,४४,२३४/-चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- सादर, विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे स्वरूप :- प्र.क्र. १ मधील राघवेंद्र स्वामी मंदिर ते बोल्हेगांव फाटा परिसरातील रेणूकानगर, मनोलिकानगर, बालाजीनगर, साईनगर येथे पथ दिव्यांची व्यवस्था करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता:- मा.स्थायी समिती ठराव क्र.७ दि.१/७/२००८ नुसार
२] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रू.१६,६२,७५९/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम :- रू.१६,६२,७५९/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन २००७-०८
५] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम :- रू. १६,६२,७५९/-
६] फेर निविदा प्रसिध्दी तारीख :- दि.२२/८/०८
७] फेर निविदा विक्री कालावधी :- दि.२२/८/०८ ते २९/८/०८
८] फेर निविदा स्विकृती तारीख. :- दि.२/९/०८
९] फेर निविदा उघडण्याची तारीख :- दि.६/१०/०८
१०]कामाची मुदत :- २ महिने
११]प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील -

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | निविदा रक्कम | देकार |
|---|---|---|---|
| १ | ए.बी. इलेक्ट्रिकल, अहमदनगर | १६,६२,७५९/- | ९.९% जादा |
| २ | प्रभंजन इलेक्ट्रिकल, अहमदनगर | १६,६२,७५९/- | ९.९% जादा |

वरील संदर्भाधीन फेर निविदा दि. २/९/०८ रोजी मागविण्यात आल्या असुन दि.६/१०/०८ रोजी निविदा इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख, अंतर्गत लेखापरिक्षक, शहर अभियंता, निविदाकार यांचे उपस्थित मा.उपायुक्त (सा.) यांचे समोर उघडण्यात आल्या, निविदा उघडले नंतर ए.बी. इलेक्ट्रिकल, अहमदनगर आणि प्रभंजन इलेक्ट्रिकल, अहमदनगर यांचा देकार ९.९०% जादा दराने आला आहे. दि.७/१०/०८ विद्युत जा.क्र. २९३ नुसार निविदा धारकास वाटाघाटी करणे कामी पत्र देण्यात आले असता ४.९०% जादा दराने किंवा सन २००८-२००९ चे दरसुची नुसार काम करण्याचे पत्र दिले आहे.

१) कामाची अंदाजपत्रकीय रक्कम : रू. १६,६२,७५९/-
२) सन २००७-०८ दरसुचीनुसार रक्कम : रू. १६,६२,७५९/-
३) सन २००८-०९ दरसुचीनुसार रक्कम : रू. १८,३५,४५३/-
४) दोन्ही दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रकमेची तफावत : रू. १,७२,६९४/-
५) सन २००७-०८ चे दरसुचीनुसार ४.९ % जादा रक्कम : रू. ८१,४७७/-
६) अंदाजपत्रकीय ४.९% जादा दराने एकुण रक्कम : रू.१७,४४,२३४/-

सदरचे काम सन २००७-०८ चे दरसुचीनुसार ४.९०% जादा दराने करण्यास ठ.क्र. ७ दि.१/७/०८ छाननी समितीने शिफारस केली असुन शिफारसी नुसार रक्कम रू. १७,४४,२३४/- चे खर्चास व रिपोर्टास मा.स्थायी समिती मंजूरी मिळणेस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे दि.२९/६/०९

उपशहर अभियंता :- इले. विभाग प्रमुख यांच्या रिपोर्ट नुसार सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मान्येतेस्तव सादर करणे योग्य वाटते. दि.०४/०७/०९

शहर अभियंता :- मा. छाननी समितीच्या शिफारशीनुसार मान्यतेस सादर. दि.११/८/०९

अंतर्गत लेखा परिक्षक :- वरील 'अ' स्थायी समितीचे मंजूरीस्तव दि.११/८/०९

मुख्य लेखा अधिकारी :- सहमती दर्शक सही दि. १३/८/०९

मा.उपायुक्त साहेब :- प्रस्तावीत मा.स्थाई समिती कडे मंजूरीसाठी पाठविणे योग्य. दि.१३/८/०९

मा.आयुक्त साहेब : सहमती दर्शक सही दि.१३/०८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे दरास व खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील राघवेंद्र स्वामी मंदिर ते बोल्हेगांव फाटा परिसरातील रेणुकानगर, मनोलीकानगर, बालाजीनगर, साईनगर येथे पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दर धारक ए.बी. इलेक्ट्रीकल ,अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या सन २००७-२००८ चे दरसुचीनुसार ४.९०%(चार पुर्णांक नव्वद शतांश टक्के) जादाचे दरास व रक्कम रूपये १७,४४,२३४/- (रूपये सतरा लाख चव्वेचाळीस हजार दोनशे चौतीस फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४७ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४७ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थ नगर येथील अण्णाभाउत्र साठे झोपडपट्टी ते राणी दाभाडे घर ते गिते किराणा स्टोअर्स ते अडागळे घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,४६,०५५/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. १३ सिध्दार्थनगर येथील अण्णाभाउ साठे झोपडपट्टी ते रानीबाई दाभाडे घर ते गिते किराणा स्टोअर्स ते अडागळे घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. लाईन टाकणे. अंतर्गत

२] प्रभाग क्रमांक १३

३] सुचविणा-यांचे नांव मा.श्री. दिप नारायण चव्हाण (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :-

| | | |
|---|---|---|
| अ] नांव :- | मागासवर्गीय कल्याणकारी योजना अ.नं.७/१३ |
| ब] तरतूद :- | रू. १,८०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. १,३९,५६,१०२/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. १,४६,०५५/- |
| इ] एकुण खर्च :- | रू. १,४१,०२,१५७/- |
| ई] शिल्लक :- | रू. ३८,९७,८४३/- |

५] सद्यस्थिती :-

६] प्रस्ताव :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | --- | रूंदी | --- |
| ब] पाईप लाईन | लांबी | ३०० | व्यास | ६५mm |
| क] गटर | | | | |
| ड] इमारतीचे क्षेत्रफळ | -- | | | |
| इ ] इतर | -- | | | |
| ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष : | -- | | | |

७] दरसुची :- म.जि.प्र.२००७-०८

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. १,४६,०५५/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री. आर.जी. सातपुते sdxxx

१०] नगररचनाकार यांचे अभिप्राय :- विकास योजनेतील रस्त्याचे एका बाजूने प्रस्तावीत काम असल्याने सदर काम करणेस हरकत नाही. टि.पी. जा.नं. २६५७ दि.२०/९/२००८

११] कार्यकारी अभियंता :- रक्कम रूपये १,४६,०५५/- चे खर्चास मा.क. योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यतेस सादर दि.२५/९/०८

१२] शहर अभियंता :- मान्यतेस्तव सादर दि.२५/९/०८

१३] मुख्य लेखा परिक्षक :- सादर मान्यतेस्तव दि.२९/९/०८

१४] मुख्य लेखाधिकारी : - प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. दि .३/१०/०८

१५] मा.उपायुक्त :- "अ" प्रस्तावीत स्थाई समितीकडे मंजूरीसाठी पाठविणे योग्य दि.०६/१०/०८

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१३/१०/०८

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थनगर येथील पाईप लाईनचे कामास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थ नगर येथील अण्णाभाऊ साठे झोपडपट्टी ते राणी दाभाडे घर ते गिते किराणा स्टोअर्स ते अडागळे घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,४६,०५५/-(रूपये एक लाख सेहेचाळीस हजार पंचावन्न फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४८ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४८ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थ नगर येथील बाबासाहेब ससे मेस समोर ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,५९,८९३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. १३ सिध्दार्थनगर येथील बाबासाहेब ससे मेस समोर ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉक्रीटीकरण करणे.

२] प्रभाग क्रमांक १३

३] सुचविणा-यांचे नांव मा.श्री. दिप नारायण चव्हाण (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

ब] तरतूद :- रू. १,८०,००,०००/- पा.नं. ७/१४

क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,४१,०२,१५७/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १,५९,८९३/-

इ] एकुण खर्च :- रू. १,४२,६२,०५०/-

ई] शिल्लक :- रू. ३७,३७,९५०/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी जुनी पी.सी.सी. गटर असुन तीची तुटफुट झालेली आहे. तसेच पूर्वीचे सिमेंट कॉक्रीटचा रस्ता खराब झालेला आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | -- | रूंदी | -- |
| ब] पाईप लाईन | लांबी | -- | व्यास | -- |
| क] गटर | --- | | | |
| ड] इमारतीचे क्षेत्रफळ | --- | | | |
| इ ] इतर | --- | | | |

ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष : --

७] दरसुची :- सा.बां.वि.२००७-०८

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. १,५९,८९३/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री. आर.जी. सातपुते sdxxx

१०] नगररचनाकार यांचे अभिप्राय :- जुने गटार दुरूस्त भरणेचे काम असल्याने सदर काम करणेस हरकत नाही. टि.पी. जा.नं. २६५९

११] कार्यकारी अभियंता :- रक्कम रूपये १,५९,८९३/- चे खर्चास मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यतेस सादर दि.२५/९/०८

१२] शहर अभियंता :- मान्यतेस्तव सादर दि.२५/९/०८

१३] मुख्य लेखापरिक्षक :- सादर, मान्यतेस्तव दि.२९/९/०८

१४] मुख्य लेखाधिकारी : - प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. दि .३/१०/०८

१५] मा.उपायुक्त :- "अ" प्रस्तावीत स्थाई समितीकडे मंजूरीसाठी पाठविणे योग्य दि.०६/१०/०८

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१३/१०/०८

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सिध्दार्थनगर येथील ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉंक्रीट करणे चे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.कांबळे र.द.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :- :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थ नगर येथील बाबासाहेब ससे मेस समोर ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉंक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,५९,८९३/-(रूपये एक लाख एकोणसाठ हजार आठशे त्र्याण्णव फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. कांबळे रवी दगडु सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४९ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -४९ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थ नगर अंतर्गत बोळामधील श्री. रामदास घर ते गुजर घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,१२,६८२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. १३ सिध्दार्थनगर अंतर्गत बोळामध्ये रामदास घर ते गुजर घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.

२] प्रभाग क्रमांक १३

३] सुचविणा-यांचे नांव मा.श्री. दिप नारायण चव्हाण (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :-

अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

ब] तरतूद :- रू. १,८०,००,०००/- पा.नं. ७/१५

क] यापुर्वीचा खर्च :- रू.१,४२,६२,०५०/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. २,१२,६८२/-

इ] एकुण खर्च :- रू.१,४४,७४,७३२/-

ई] शिल्लक :- रू.३५,२५,२६८/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणचा कॉंक्रीटचा रस्ता खराब झालेला असलेने नागरिकांना जाणे येणेस त्रास होतो.

६] प्रस्ताव :-

अ] रस्ते लांबी १५० रूंदी ४.००

ब] पाईप लाईन लांबी -- व्यास ---

क] गटर

ड] इमारतीचे क्षेत्रफळ ---

इ ] इतर ---

ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष : --

७] दरसुची :- सा.बां.वि.२००७-०८

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. २,१२,६८२/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री. आर.जी. सातपुते sdxxx

१०] नगररचनाकार यांचे अभिप्राय :- अस्तित्वातील रस्ता दुरूस्त करणेचे काम असल्याने सदर काम करणेस हरकत नाही. टि.पी. जा.नं. २६५८ दि-२०/९/२००८

११] कार्यकारी अभियंता :- रक्कम रूपये २,१२,६८२/- चे खर्चास मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यतेस सादर दि.२५/९/०८

१२] शहर अभियंता :- मान्यतेस्तव सादर दि.२५/९/०८

१३] मुख्य लेखापरिक्षक :- सादर, मान्यतेस्तव दि.२९/९/०८

१४] मुख्य लेखाधिकारी : - प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. दि .३/१०/०८

१५] मा.उपायुक्त :- "अ" प्रस्तावीत प्रशासकीय मंजुरीसाठी स्थायी समितीकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर. दि.०६/१०/०८

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१३/१०/०८

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र. १३ सिध्दार्थनगर अंतर्गत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ सिध्दार्थ नगर अंतर्गत बोळामधील श्री. रामदास घर ते गुजर घरापर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,१२,६८२/- (रूपये दोन लाख बारा हजार सहाशे ब्याऐंशी फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ५० मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -५० मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील श्री. काळभोर घर ते निलेश स्टील फर्निचर आणि मोहिनी नगर ,श्री.ज्ञानेश्वर मंदिर ते तपोवन रोड नाथकृपा बंगला आणि नाथकृपा बंगला ते जोंधळे फार्म पर्यत १०० व १५० एमएम व्यासाची पाण्याची जी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,६७,८८३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव अ.नगर महानगरपालिका
सार्व.बांध.वि.दि३१/७/२००९

१] कामाचे नांव :- प्र.क्र.३ व ४ मध्ये १००एमएम व १५०एमएम व्यासाची काळभोर घर ते निलेश स्टिल फर्निचर आणि मोहिनीनगर ज्ञानेश्वर मंदिर ते तपोवन रोड नाथकृपा बंगला आणि नाथकृपा बंगला ते जोंधळे फार्म पर्यत जी.आय. पाण्याची लाईन टाकणे.

२] प्रभाग क्रमांक

३] सुचविणा-यांचे नांव मा. नगरसेविका सौ. शारदा ढवण / मा.नगरसेवक बाळासाहेब पवार

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- वाढीव हद्दीत पाईप लाईन टाकणे.

ब] तरतूद :- रू. ११.६७ लाख पा.नं.१३ व अ.नं.१९वर नोंद

क] यापुर्वीचा खर्च :- रू.३०,०५,२१८/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १२,६७,८८३/-

इ] एकुण खर्च :- रू. ४२,७३,१०१/-

ई] शिल्लक :- रू.३१,०६,१०१/-

५] सद्यस्थिती :- सद्यस्थितीत पाण्याची लाईन ही तपोवन रोडने गेलेली आहे. त्यामुळे अंतर लांब पडते व पाण्याला प्रेशर कमी येते. तसेच नवीन लाईन मुळे पाणी वाटपाचा वेळ वाचेल व वसंत टेकडी येथील ६० HP पंपाचे पंपींग कमी करता येईल.

६] प्रस्ताव :-

अ] रस्ते लांबी --- रूंदी --
ब] पाईप लाईन लांबी --- व्यास --
क] गटर व्यास १००एमएम,१५०एमएम लांबी ६००मी,४००मी.
ड] इमारतीचे क्षेत्रफळ
इ ] इतर
ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष : --

७] दरसुची :- म.जि.प्र.२००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. १२,०७,५०८/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- मनोज सुभाष पारखे sdxxx/-

मा. मेकॅनिकल इंजिनियर :- अहवालानुसार मंजूरीस्तव सादर.

अंतर्गत लेखा परिक्षक :- सादर, अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा खर्चास अंदाजपत्रकीय तरतुद करून मान्यता देणेस हरकत नाही.

मुख्य लेखा अधिकारी :- काम निवड समितीच्या शिफारसीनुसार रक्कम रू. १२,०७,५०८/- चे खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. दि.१३/८/०९

मा.उपायुक्त साहेब :- प्रस्तावीत प्रशासकीय खर्च मान्य करणेस हरकत नाही मंजुरीस्तव सादर. १३/८/०९

मा.आयुक्त साहेब :- स्थायी समितीची मंजूरी घ्यावी. दि.१४/०८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ३ व ४ मध्ये जी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख नजीर अ.अ.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील श्री. काळभोर घर ते निलेश स्टील फर्निचर आणि मोहिनी नगर ,श्री.ज्ञानेश्वर मंदिर ते तपोवन रोड नाथकृपा बंगला आणि नाथकृपा बंगला ते जोंधळे फार्म पर्यत १०० व १५० एमएम व्यासाची पाण्याची जी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,६७,८८३/-(रूपये बारा लाख सदुसष्ठ हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख नजीर अहमद अ.रज्जाक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**

विषय क्रमांक- ५१ मंगळवार दि.२५/८/२००९

ठराव क्रमांक -५१ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. विजय बन्सीलाल चोरडिया यांना वॉर्ड क्र. ४० दत्त चौक केडगांव येथील घर नं. १०७ पै. या ठिकाणी अद्यापपर्यंत नळ कनेक्शन दिलेले नसल्याने त्यांना बील क्रमांक २ दिनांक १/१/२००९ अन्वये दिलेले सन २००२ ते २००९ अखेरचे रूपये ८,२५०/- चे पाणी पट्टी चे बील निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :-मा.सादर,विषय-अद्यापपर्यंत नळकनेक्शन घेतलेले नसतांना मनपाने दिलेले
पाणीपट्टीचे बिल रद्द होणे बाबत.
संदर्भ :- १]श्री. विजय बन्सीलाल चोरडीया वॉर्ड नं. ४० बि.नं.२ दत्त चौक
केडगांव यांचा दि.७/७/०९ चा अर्ज.
२] श्री. मा.संदिप भा. कोतकर , माजी महापौर यांचे दि. २२/७/०९ चे पत्र.

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरून रिपोर्ट करण्यात येतो की,श्री. विजय बन्सीलाल चोरडिया वॉर्ड नं. ४०बिल नं.२ दत्त चौक केडगाव,अ.नगर यांनी दि.७/७/०९रोजी अर्ज देवून कळविले आहे की,त्यांनी सदर ठिकाणी नळकनेक्शन घेतलेले नसुन त्यांना आलेले पाणीपट्टीचे बिल रद्द करून पाणीपट्टी आकारली जावू नवे असे कळविले आहे.

तसेच मा. महापौर यांनी देखील दिनांक २२/७/०९ रोजी लेखी अर्ज देवून सदर जागेची प्रत्यक्ष पहाणी करून नजर चुकीने नळ कनेक्शनची केलेली आकारणी रद्द करून बिल रद्द करण्याबाबत मागणी केलेली आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील फिटर यांनी पहाणी केली असता सदर जागेवर १/२" इंची नळकनेक्शन घेतलेल्याचे आढळुन येत नाही. तसेच पाणीपुरवठा विभागाकडील रेकार्ड तपासणी केली असता नळकनेक्शन दिल्याची नोंद आढळुन येत नाही.

तरी सदर ठिकाणी म.न.पा.ने अद्यापपर्यंत नळ कनेक्शन दिले नसल्याने नजर चुकीने त्यांना दिलेले सन २००२ ते २००९ अखेरचे रूपये ८२५०/- चे पाणी पट्टीचे बिल रद्द करण्यास तसेच येथून पुढील वर्षासाठी पाणीपट्टी आकारणी न करण्यास तसेच सदरच्या नोंदी संगणकावर व रेकॉर्डवर घेण्यास मंजूरीस्तव सादर.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे विभागप्रमुख केडगाव विभाग, व कनिष्ठ अभियंता श्री. एस.आर.निंबाळकर यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब :- मु.ले.प. , मुलेअ द्वारा सादर करा. दि. १०/८/०९

मुख्य लेखा अधिकारी :- या बाबत प्रभाग अधिकारी बुरूडगाव (समिती क्र.४) यांनी सुस्पष्ट अभिप्राय करावेत दि.११/८/०९

प्रभागअधिकारी बुरूडगाव प्रभाग क्र.४:- सादर, केडगांव विभाग प्रमुख यांचे रिपोर्टानुसार मान्यतेस्तव सादर.

मुख्य लेखा परिक्षक :- वरील "अ" प्रमाणे केडगांव विभागाने प्रस्तावीत केले नुसार पाणी पट्टी कर रद्द करावा. परंतु अशा प्रकारे चुकीची आकारणी केले बाबत संबंधीत लिपीका, विभाग प्रमुख यांना लेखी ताकीद घ्यावी. दि.११/०८/०९

मुख्य लेखा अधिकारी :- अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव सादर. दि.१३/८/०९ **"अ"**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- 'अ' प्रस्तावीतनुसार कर निर्लेखित करणेबाबत मु.प्रा. म.न.पा. अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार सदरची पाणीपट्टीचे प्रस्तावीत सन २००२ ते २००९ चे बिल रद्द करणेच अधिकार मा.स्थायी समितीस आहेत सबब आदेशार्थ सादर. **"अ"**

मा.आयुक्त साहेब :- **'अ'** नुसार स्थायी समितीस सादर. दि.१३/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- या व्यक्तिस घर नाही तरी ही बील दिले कसे.

मा.श्री. शेख नजीर अ.अ.र.:- बोल्हेगांव भागात ही असेच बील दिले गेलेले आहे. जादा रकमेचे बील दिले गेले आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- नळ कनेक्शन घेतलेले नसताना बिले दिली कशी जातात.

मा.सभापती साहेब :- माहिती सांगावी.

केडगांव वि. प्रमुख श्री. कुलकर्णी :- अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील फिटर यांनी जागेची पहाणी केली असता सदर जागेवर १/२इंची नळ कनेक्शन घेतल्याने आढळून आले नाही पाणी पुरवठा विभागाकडील रेकॉर्ड तपासणी केली असता नळ कनेक्शन दिल्याचे आढळून येत नाही. नजर चुकीने त्यांना दिलेले सन २००२ ते २००९ अखेर रू.८२५०/- चे पाणी पट्टीचे बील रद्द करण्यांस प्रस्ताव सादर केला आहे.

मा.सभापती साहेब :- हे बील कुणी दिलेले आहे.

केडगांव वि. प्रमुख श्री. कुलकर्णी :- श्री. साबळे देवराम यांनी दिलेले आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- रिकामे प्लॉट वर नळ कनेक्शन दाखविले, बील दिले बद्दल संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करावी.

मा.श्री. शेख नजीर अ.अ.र.:- जादा बीले देतात असे सगळी कडे होते.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- सदर प्रकरणी संबंधीत कर्मचा-यांची चौकशी करावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. संबंधीताची चौकशी करावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार नळ कनेक्शन दिलेले नसल्याने अर्जदार यांना दिलेले बील निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.चुकीची आकारणी केले बध्दल संबंधीत लिपिकाची चौकशी करावी.

**ठराव :-** अर्जदार श्री. विजय बन्सीलाल चोरडिया यांना वॉर्ड क्र. ४० दत्त चौक केडगांव येथील घर नं. १०७ पै. या ठिकाणी अद्यापपर्यत नळ कनेक्शन दिलेले नसल्याने त्यांना बील क्रमांक २ दिनांक १/१/२००९ अन्वये दिलेले सन २००२ ते २००९ अखेरचे रूपये ८,२५०/- (रूपये आठ हजार दोनशे पन्नास फक्त) चे पाणी पट्टी चे बील निर्लेखित करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मात्र अशा प्रकारे चुकीची आकारणी केलेल्या संबंधीत लिपीकाची विभागीय चौकशी करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-४**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ५२ मंगळवार दि.२५/८/२००९
ठराव क्रमांक -५२ मंगळवार दि.२५/८/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचिवर विविध पदे निर्माण करणे बाबतचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय :- आस्थापना कायम सुचीवर पदे निर्माण करणे बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर होवुन जवळपास ५ वर्ष पुर्ण झालेली आहेत.अहमदनगर शहराचा ८८ चौ.मी. इतका मोठा क्षेत्रफळाचा विस्तार असुन त्यामध्ये एकुण ६५ प्रभाग आहेत.अहमदनगर महानगरपालिकेमध्ये बहुतांशी यापुर्वी केडगांव,सावेडी उपविभाग,नागापुर,बुरूडगांव, फकिरवाडा व बोल्हेगांव इत्यादी भागांचा समावेश झालेला आहे. सदरचा भाग मोठया प्रमाणात क्षेत्रफळाने विस्तारीत आहे. त्या ठिकाणी नव्याने दैनंदिन विकासकामे करतांना आवश्यकते प्रमाणे पद संख्या वर्गाचा आवश्कता भासत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत बुरूडगांव, झेंडीगेट, शहर विभाग व सावेडी विभाग असे चार प्रभाग समिती स्थापन करण्यांत आलेल्या आहेत. सदर समिती मार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे सुचित आहे. त्यानुसार सदर प्रभागाकरिता अंमलबजावणी करणेसाठी प्रभाग अधिकारीची आवश्यकता आहे. सदर चार प्रभागकरिता ४ प्रभाग अधिकारी आस्थापना कायम सुचीवर पदसंख्या मंजुर करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदारी पाहता त्यांचे पदनामनुसार वेतनश्रेणी रूपये ६५००-१०५०० अशी असणे उचित वाटते.

अहमदनगर शहरातील मोठया क्षेत्रफळाचा विस्तार पाहता मालमत्ता कर वसुलीकरिता सहाय्यक आयुक्त (कर) पदाची आवश्यकता आहे. त्याकरिता सहाय्यक आयुक्त (कर) एक पद मंजुर होणे आवश्यक वाटते.

त्याचप्रमाणे आरोग्य विभागामार्फत शहरातील घनकचरा व्यवस्थापना बाबत कच-याची विल्हेवाट लावणे बाबत मा. न्यायालयाने सक्त निर्देश दिलेले असुन त्याचप्रमाणे घनकचरा विल्हेवाट अंमलबजावणी व नियत्रंण ठेवणे करिता सदर आरोग्य विभागासाठी सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) असे पदनाम मंजुर होणे आवश्यक आहे.

सहाय्यक आयुक्त (कर) व सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) असे पदनाम मंजुर केल्यास आस्थापना कायम सुचीवरील प्रशासन अधिकारी व उप आरोग्याधिकारी असे पदनाम व्यपगत करणे योग्य वाटते. त्यामुळे आस्थापना वेतनावरील खर्चाच्या टक्केवारी कमी होण्यास मदत होईल.

त्याच प्रमाणे सध्या कायम आस्थापना सुचीवर बांधकाम विभागाकरिता खालीलप्रमाणे अभियंते कार्यरत आहेत.

| अ.नं. | अभियंत्याचे नांव | पदनाम | मंजुर वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | श्री. एन.बी. मगर | सिव्हील इंजिनियर | ८०००-१३५०० |
| २ | **रिक्त** | सिव्हील इंजिनियर | ८०००-१३५०० |
| ३ | श्री.आर.जी. सातपुते | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ४ | श्री. एम.डी. काकडे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ५ | श्री. व्ही.जी. सोनटक्के | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ६ | श्री. आर.जी. मेहत्रे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ७ | श्री. के. वाय. बल्लाळ | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ८ | श्री. बी. एम. अनाप | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ९ | श्री. एन.एल. नामदे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| १० | श्रीमती एस.बी. बेलकर | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ११ | श्री. एस.आर. निबांळकर | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| १२ | श्री. एम.एस. पारखे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| १३ | श्री. जी.के. गाडळकर | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |

अहमदनगर शहराला अंदाजे ३१ ते ३२ किलो मीटर इतक्या लांबुन मुळानगर येथुन पाणी पुरवठा विळद घाट येथे जल शुध्दीकरण केंद्र येथे आणण्यांत येवुन तद्नंतर शहरातील विविध भाग व उपनगरातील विविध टाक्यामध्ये पाणी साठवणुक करून पाणी वितरण केले जाते. सदर पाणी पुरवठा विभागाकरिता फक्त एकच मेकॅनिकल इंजिनियर श्री. पी.जे. निकम कार्यरत आहेत.

संपुर्ण केडगांव पाणी पुरवठा योजना कार्यन्वीत करणे करिता व शहरातील पाणी वितरण मधील त्रुटी दुर करणे करिता तसेच अतिक्रमण विभागाकरिता कर्मचारी स्टॉफ (तांत्रिक) अपुरा पडत असल्यामुळे खालीलप्रमाणे नवीन पदे स्वतंत्र निर्माण केल्यास शहरातील व उपनगरामधील पाणी पुरवठा वितरणामध्ये सुधारणा होईल तसेच अतिक्रमण निर्मुलन होण्यांस मदत होईल.

| अ.नं. | पदाचे नांव | पद संख्या | वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त (महसुल) | १ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| २ | सहाय्यक आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन ) | १ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेच्या पदवीधर |
| ३ | प्रभाग अधिकारी | ४ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| ४ | उप अभियंता (प्रभाग) | ४ | ८०००-१३५०० | बी ई सिव्हील,३ वर्ष अनुभव, पदवी धारक असल्यास अनुभव १० वर्ष |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १३ | ५५००-९००० (पदवी) ५०००-८००० (पदविका) | बी ई असल्यास ३ वर्ष अनुभव ( ५५००-९०००) पदवी धारक असल्यास १० वर्षाचा अनुभव (५०००-८०००) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा) | ७ | ५०००-९००० (पदवी) ५०००-८००० (पदविका) | बी ई असल्यास ३ वर्ष अनुभव ( ५५००-९०००) पदवी धारक असल्यास १० वर्षाचा अनुभव (५०००-८०००) |
| ७ | कनिष्ठ अभियंता (विदयुत) | ४ | ५०००-९००० (पदवी) ५०००-८००० (पदविका) | बी ई असल्यास ३ वर्ष अनुभव ( ५५००-९०००) पदवी धारक असल्यास १० वर्षाचा अनुभव (५०००-८०००) |
| | | **मुळा धरण ते विळद पाणी पुरवठा योजना** | | |
| ८ | शिफ्ट इंजिनियर (स्थापत्य) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| ९ | शिफ्ट इंजिनियर (मेकॅनिकल) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १० | शिफ्ट इंजिनियर (विद्युत) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| ११ | शिफ्ट इंजिनियर (रजा राखीव) स्थापत्य | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १२ | पंपचालक | ४ | ३०५०-४५९० | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन मेकॅनिकल ट्रेड उत्तीर्ण |
| | | **विळद जल शुध्दीकरण** | | |
| १३ | शिफ्ट इंजिनियर (स्थापत्य) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १४ | शिफ्ट इंजिनियर (विद्युत) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १५ | शिफ्ट इंजिनियर ( यांत्रिकी) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविका धारक |
| १६ | शिफ्ट इंजिनियर (रजा राखीव) स्थापत्य | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १७ | पंपचालक | ७ | ३०५०-४५९० | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन मेकॅनिकल ट्रेड उत्तीर्ण |
| १८ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | १ | ४५००-७००० | बी एस सी  रसायन शास्त्र |
| १९ | गाळणी निरिक्षक | २ | ४०००-६००० | १२ वी सायन्स उत्तीर्ण |
| २० | गाळणी परिचर | ८ | २६१०-४००० | एस.एस.सी. उत्तीर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **वसंत टेकडी** | | |
| २१ | शिफ्ट इंजिनियर (स्थापत्य) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २२ | शिफ्ट इंजिनियर ( यांत्रिकी) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २३ | शिफ्ट इंजिनियर (विद्युत) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २४ | पंपचालक | ४ | ३०५०-४५९० | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन मेकॅनिकल ट्रेड उत्तीर्ण |
| | | **अतिक्रमण विभाग** | | |
| २५ | सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण) | १ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| २६ | स्थापत्य अभियंता | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २७ | सर्व्हेअर | २ | ३०५०-४५९० | |
| २८ | अभियांत्रिकी सहाय्यक (स्थापत्य) | २ | ३०५०-४५९० | शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील स्थापत्य अभियांत्रिका स्थापत्य उत्तीर्ण |
| | | **विद्युत विभाग** | | |
| २९ | विद्युत उप अभियंता | १ | ८०००-१३५०० | बी ई (इलेक्ट्रीक) |
| ३० | शाखा अभियंता | १ | ६५००-१०५०० | डी ई ई, किमान १० वर्षाचा अनुभव |
| | | **वाहन विभाग** | | |
| ३१ | उप अभियंता | १ | ८०००-१३५०० | बी ई , मेकॅनिकल |
| ३२ | कनिष्ठ अभियंता | १ | ५०००-८००० | डी ई ई / डी एम ई |

सध्या आस्थापना सुचीवर खालीलप्रमाणे पदे मंजुर असुन आवश्यक जादा पदे मंजुर करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | पदाचे नांव | नवीन आवश्यक पदे | सध्या मंजुर पद संख्या | आवश्यक जादा पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त | ३ | --- | ३ |
| २ | उप अभियंता | ६ | --- | ६ |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ३८ | १४ | २४ |
| ४ | प्रभाग अधिकारी | ४ | --- | ४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | पंपचालक | ११ | १२ | --- |
| ६ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | १ | --- | १ |
| ७ | गाळणी निरिक्षक | २ | २ | --- |
| ८ | गाळणी परिचर | ८ | ८ | --- |
| ९ | सर्व्हेअर | २ | --- | २ |
| १० | अभियांत्रिका सहाय्यक (स्थापत्य) | २ | --- | २ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात वसुली ठेका पध्दतीने होणार असल्याने त्यापासून महानगरपालिकेचे चांगल्या प्रकारे जादा अपेक्षित उत्पन्न होणार आहे. आस्थापना खर्चावरील टक्केवारी ४६.४०% इतकी आहे. परंतु मालमत्ता कर व पाणी पट्टी वसुली प्रभावीपणे करणेत येत असुन त्यामुळे उत्पन्नाचे स्त्रोत वाढवुन आस्थापना खर्च कमी करण्यासाठी जाणीव पुर्वक प्रयत्न होत आहे. त्यांचे चांगले भविष्यात परिणाम दिसुन येणार आहेत. त्याचप्रमाणे इतर ही बाबतीत अदा. दुरध्वनी, इंधन खर्च, वाहन खर्च, स्टेशनरी, वीज बचत इत्यादी खर्चात ही काटकसर करणेत येत आहे. त्यामुळे आस्थापना वरील सध्याचे खर्चाची टक्केवारी निश्चितच कमी होण्यास मदत होणार आहे.

आस्थापना कायम सुचीवरील आवश्यक पदे मंजुर नसल्याने दैनंदिन विकास कामावर विपरित परिणाम होवुन उत्पन्न वाढविणेमध्ये अडचणी निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा सारख्या अत्यावश्यक सेवेच्या वितरणामध्ये त्रुटी निर्माण होवुन नागरिकांमध्ये मनपाच्या सेवेबाबत असंतोष निर्माण होत आहे.

त्याकरिता वरील प्रमाणे आस्थापना कायम सुचीवर तात्काळ पदे निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी मासिक अंदाजे रूपये ५,९०,७६०/- जादा खर्च वाढणार आहे. सध्याचा खर्च ४६.४६ %असुन त्यामध्ये ०.९६ % ने वाढ होवुन ४७.३६% होईल.

सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५१नुसार मा.स्थायी समिती व मा.महासभेची मंजुरीने मा.नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडे मंजुरीस्तव पाठविणे आवश्यक आहे.

तरी सदरचे पदे कायम आस्थापना सुचीवर तात्काळ निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजुरी होवुन मा.महानगरपालिकेच्या महासभेपुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव ठेवणेबाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सोबत- अनावश्यक व व्यपगत करावयाचे पदाचा तक्ता.

अनावश्यक व व्यपगत करावयाची पदाची माहिती.

| अ.नं. | पदाने नांव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रशासनाधिकारी | ७४५०-११५०० | १ |
| २ | हेडक्लार्क | ६५००-१०५०० | १ |
| ३ | अकौंट चेकर | ५५००-९००० | १ |
| ४ | असि. शॅाप इन्स्पेक्टर | ५५००-९००० | १ |
| ५ | असि.टु. हेडक्लार्क | ५५००-९००० | १ |
| ६ | शिरस्तेदार | ५०००-८००० | १ |
| ७ | असि. ओव्हरसिअर | ५०००-८००० | १ |
| ८ | रोड बिल्डींग मिस्त्री | ४०००-६००० | २ |
| ९ | तालिम मास्तर | ३०५०-४५९० | २ |
| १० | कॅशियर बुकबँक | ५५००-९००० | १ |
| ११ | केमिकल क्लार्क | ४०००-६००० | १ |

sdxxx /-
आयुक्त

अंतर्गत लेखा परिक्षक :- सादर, मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव. दि.२२/०४/०९

मुख्य लेखा अधिकारी :-कायम आस्थापना सुचीवर पदे निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सादर करणे योग्य दि. २२/४/०९

मा.उपायुक्त साहेब :- प्रस्तावीतनुसार मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.२२/४/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२२/४/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा. उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मागिल सभेमध्ये हा विषय तहकुब केलेला आहे तो पुन्हा सभे पुढे मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार कार्यवाही करावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये ब-याच चुका झालेल्या आहेत बी.ई.व पदवी धारक यांच्या मध्ये काय फरक आहे ? काय बदल आहे ? कनिष्ठ अभियंता स्थापत्य साठी बी.ई. असल्यास अनुभव तीन वर्ष व पदवी धारक असल्यास दहा वर्षाचा अनुभव हा कसा दाखविला कनिष्ठ अभियंता पदाला बी.ई. व पदवी धारक असे दाखविलेले असून शिफ्ट इंजिनिअर स्थापत्य या पदाला डी.एम.ई.डी.ई. अशा पदव्या दिलेले आहेत. अशा चार ठिकाणी चुका झालेल्या आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पदवी धारक अशा ठिकाणी पदविका धारक असे हवे होते. आस्थापना प्रमुख्यांनी हया झालेल्या चुका दुरूस्त कराव्यात हया टाईप मिस्टेक आहेत दुरूस्तीसह प्रस्तावास मा. सभेने मंजूरी द्यावी. सदर प्रस्तावाप्रमाणे पदनिर्मिती होणे आवश्यक आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- ऑफिस रिपोर्टामध्ये क्वालिफिकेशन बाबत झालेल्या चुका दुरूस्त कराव्यात दुरूस्त प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यात यावा.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- "ड" वर्ग महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक सहाय्यक आरोग्याधिकारी हे पद निर्माण करणे बाबत उल्लेख आहे असे असतांना सध्या उपलब्ध असणारे उपआरोग्याधिकारी हे पद रद्द करण्यांत येउ नये.तसेच मा.स्थायी समिती मध्ये ज्या विभागाचा विषय मंजूरीसाठी सादर केलेला असतो त्या विषया वरील चर्चेच्या वेळी संबंधीत विभाग प्रमुख्यांनी सभेत हजर रहावे.

मा.सभापती साहेब :- आस्थापना कायम सुचीवर विविध पदे निर्माण करणे पदे व्यपगत करणे अशाबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये दुरूस्त्या करणे बाबत स्थायी समिती सदस्य मा.श्रीमती ढोणे मालन सुरेश , मा.श्री. शेख अहमद अ.रज्जाक , मा.श्री. पंजाबी जसपालसिंग निंरजनसिंग , मा.श्री. शेलार नितीन शिवाजीराव , तसेच सभागृह नेता, मा.श्री. शेख आरिफ रफियोद्दीन, विरोधी पक्ष नेता, मा.श्री. डागवाले किशोर आसाराम यांनी व उपआरोग्याधिकारी डॉ. श्री. पैठणकर एन.एस. यांनी पत्र देउन्र सुचना केलेल्या आहेत.

मा.श्री. पवार द.ज.:- सदर प्रमाणेचे दुरूस्त्यासह प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- आस्थापना कायम सुचिवर विविध पदे निर्माण करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना प्रमाणे दुरूस्त्या करून प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचिवर विविध पदे निर्माण करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना प्रमाणे दुरूस्त्या करून प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी सादर करण्यांत यावा.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.